# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक गा–हाणे निवारण मंच
# नागपुर शहर परिमंडळ, नागपुर.

---

## प्रकरण क्रं. ग्रागानिमं/नाशप/०७४ /२०१०

अर्जदार : श्री किशोरीलाल बोबारीया
तर्फे यशपाल किशोरीलाल बोबारीया
राहणार फ्यॉट नं. १३/५, एन.एस.के. सोसायटी
टेंम्पल रोड, सिव्हील लाईन,
नागपूर.

– विरूध्द –

गैरअर्जदार : कार्यकारी अभियंता,
सिव्हील लाईन विभाग,
म.रा.वि.वितरण कंपनी मर्या,
नागपुर.

गणपुर्ती : १) श्रीमती के.के घरत,
सदस्य–सचिव

२) श्रीमती गौरी चांद्रायण,
सदस्या

–– अतंरिम आदेश ––

पारीत दि. २१.१०.२०१०

ग्राहक गा–हाणे निवारण मंचात अर्जदार यांनी तक्रार अर्ज दिनांक १९.१०.२०१० रोजी महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग (ग्रागानिम व विद्युत लोकपाल) विनियम २००६ कलम ८.३ प्रमाणे दाखल केलेला आहे.

## अर्जदाराच्या गा–हाण्याचा तपशील :–

१. श्री. यशपाल किशोरीलाल बोबारीया, अर्जदार, यांनी गैरअर्जदारातर्फे कुठलीही पुर्व सुचना न देता, त्यांचा विद्युत पुरवठा खंडीत करून मीटर जप्त केल्याबदद्ल, मंचात अंतरिम आदेशाकरीता दिनांक १९.१०.२०१० रोजी अर्ज दाखल केला आहे.

२. दिनांक २०.१०.२०१० रोजी मंचात अंतरिम आदेशाकरिता सुनावणी घेण्यात आली, दोन्ही पक्ष उपस्थित होते. गैरअर्जदारातर्फे श्री. सुरेश गंधेवार, कार्यकारी अभियंता, सिव्हील लाईन्स विभाग, व श्री. देशमुख, उपकार्यकारी अभियंता, सेमिनरी हिल्स उपविभाग हे उपस्थित होते.

अर्जदार श्री यशपाल बोबारीया, यांनी आपली बाजु मांडतांना सांगितले की गैरअर्जदाराने विद्युत कायदा २००३ च्या कलम ५६ (१) अन्वये नोटीस न देता, त्यांचा घरचा विद्युत पुरवठा खंडीत केला आहे व मीटर सुध्दा जप्त केले आहे. तेव्हा संबंधीतांवर कार्यवाही करून त्यांना झालेल्या मानसिक व शारीरिक त्रासाबद्यल, रू. १०,०००/– नुकसान भरपाई देण्याची आणि त्यांचा विद्युत पुरवठा पुर्ववत सुरू करण्याची विनंती मंचाला केली आहे.

३. गैरअर्जदाराने आपली बाजु मांडतांना सांगितले की अर्जदाराच्या घरी असलेला विद्युत पुरवठा श्री. किशोरीलाल बोबारीया या नावाने असुन ग्राहकाने जुलै २०१० पासुन विद्युत देयक न भरल्यामुळे २७.०९.२०१० रोजी तात्पुरता खंडीत करण्यात आला होता. त्यावेळेस मीटरवरील वाचन १७४९४ युनिट होते. अर्जदाराच्या घरी विद्युत जोडणीची दिनांक १८.१०.२०१० रोजी पाहणी केली असता, मीटरचे वाचन १७६३५ आढळले हयाचा अर्थ की अर्जदाराने वि़द्युत देयकाची थकबाकी न भरता अनधिकृतरित्या पुरवठा जोडुन घेतला होता. त्यामुळे ग्राहकाचे मीटर जप्त करण्यात आले आहे. विद्युत पुरवठा

खंडीत करण्याकरीता नियमानुसार ०३.०९.२०१० रोजी नोटीस पाठविली होती परंतु ग्राहकाने नोटीस घेण्यास नकार दिला.

अर्जदार हा नेहमी विद्युत पुरवठा खंडीत करणा–या यादीत असतो, कारण तो कधीच वेळेवर पैसे भरत नाही. त्यांनी जानेवारी २००९ पासुन ते आतापर्यंत (२२ महिन्यापैकी) फक्त सात वेळा विद्युत देयक भरणा केला आहे. तसेच कंपनीने केलेली कार्यवाही नियमाप्रमाणे असुन वीज पुरवठा नियीमत देते आणि कंपनीचा महसुल वसुल करणे हा उददे्श आहे. तेव्हा अर्जदाराची मागणी रदद् करण्याबाबतची विनंती गैरअर्जदाराने मंचाला केली.

४. मंचाने दोन्ही पक्षाचे म्हणणे ऐकले. सुनावणीच्या दरम्यान गैरअर्जदाराला नोटीसची पोचपावती विचारल्यावर त्यांनी मंचाला ती सादर केली. परंतु त्यात अर्जदाराचे हस्ताक्षर नव्हते. तसेच गैरअर्जदाराने सांगितले की ग्राहकाने नोटीस घेण्यास नकार दिल्यामुळे, त्यांनी ती नोटीस त्या भागातील चौकीदारास दिली होती. परंतु अर्जदाराने त्यावर आक्षेप घेतले की तिथे कुठलाही चौकीदार नाही व त्यांना कुठलीही नोटीस मिळाली नाही.

५. सुनावणीच्या दरम्यान अर्जदारास विद्युत देयक वेळेवर न भरणा केल्याबाबत विचारणा केली. तेव्हा अर्जदाराने मंचाला सांगितले की विद्युत देयक दर महिन्याला भरणा केले पाहीजे, असे कुठेही नमुद नाही व विहीत मुदत संपल्यावर ते नेहमी अतिरिक्त रक्कम भरणा करतात. यावर मंचाचे असे म्हणणे आहे की जरी विद्युत देयकावर असे नमुद नसले की ते दर महिन्याला भरणे गरजेचे आहे, शेवटच्या तारीखेच्या आंत विद्युत देयक भरणे ही अर्जदाराची नैतीक जबाबदारी आहे, तसेच महाराष्ट्र विज नियामक आयोग (विद्युत संहिता आणि पुरवठयाच्या अटी) विनियम, २००५, विनियम १५.५.३ व १५.५.४ अनुसार..

“देयक न मिळाल्यामुळे किंवा हरविल्यामुळे, देय दिंनाकाच्या आंत, देयकाच्या रकमेचा भरणा करण्याच्या जबाबदारीतुन ग्राहकाची सुटका होणार नाही”.

“जो ग्राहक देयकाची रक्कम भरणा करण्याकडे दुर्लक्ष करेल त्याचावर आयोगाच्या संबंधित आदेशानुसार विलंब भरणा आकार आणि व्याज आकारण्यात येईल, सुरक्षा अनामतीचे विनियोजन (appropriation) करण्यात येईल आणि / किंवा अधिनियम आणि या विनियमातील तरतुदीनुसार वीज जोडणी तोडण्यात येईल”.

याचाच अर्थ असा कि ग्राहकाने विद्युत देयक विहित मुदतीत भरणे बंधणकारक आहे. त्यामुळे अर्जदाराने विहीत मुदतीत विद्युत देयकाचा भरणा करून त्यांना होणारी गैरसोय टाळायला हवी होती.

६. गैरअर्जदाराने विनियमानुसार विद्युत पुरवठा खंडीत करण्याची नोटीस अर्जदाराला पाठविल्याचे मंचाला स्पष्ट होते, परंतु ती अर्जदारास मिळाली नाही. त्यामुळे अर्जदाराचा विद्युत पुरवठा जोडुन त्याला विद्युत कायदा २००३ च्या कलम ५६ (१) अनुसार लिखीत नोटीस पाठविण्यात यावी.

तसेच अर्जदार विद्युत पुरवठ्याचे वापर करून सुध्दा अनियमितपणे देयक भरणा करीत आहे, असेही मंचाला स्पष्ट झाले आहे तेव्हा अर्जदाराची नुकसान भरपाईची मागणी मंचाला न्यायोचित वाटत नाही.

# आदेश

१. गैरअर्जदाराने त्वरीत अर्जदाराचा विद्युत पुरवठा पुर्ववत करावा व आदेशाच्या दिनांकापासुन विद्युत कायदा २००३ कलम ५६ (१) अन्वये १५ दिवसांची लिखित नोटीस अर्जदाराला पाठवावी.

२. अर्जदाराची नुकसान भरपाईची मागणी रदद् करण्यात येत आहे.

सही/–
(श्रीमती के.के. घरत)
सदस्य–सचिव

सही/–
(श्रीमती गौरी चांद्रायण)
सदस्या

सदस्य–सचिव
(कार्यकारी अभियंता)
ग्राहक गा-हाणे निवारण मंच (ना.श.प.)
म.रा विद्युत वितरण कंपनी मर्या. नागपूर.